बीड । रविवार
२३.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३४४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# औरंगजेबाची कबर काढायला तुमची मुलं पाठवा
## गरिबांची मुलं पाठवू नका; संजय राऊतांचे अमित शहांवर टीकास्त्र



**मुंबई । प्रतिनिधी**

देशात एकता आणि अखंडता राखण्याचे, कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम गृह मंत्रालयाचे आहे. ज्या शक्ती वारंवार औरंगजेबाचे नाव घेऊन देशात अस्थिरता निर्माण करतात.

त्यांना रोखलं नाही, तर हा देश एक राहणार नाही, असे टीकास्त्र शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी डागले. राज्यसभेत बोलताना संजय राऊत म्हणाले, 'तुम्हाला औरंगजेबाची कबर काढायची तर फावडे घेऊन जा. तुमची मुलं पाठवा, गरिबाची मुलं पाठवू नका.'

राज्यसभेत बोलताना राऊतांनी औरंगजेबच्या मुद्द्यावरून सरकारला घेरले. ते म्हणाले. गृह मंत्रालयावर आपण चर्चा करतोय आणि मी बघितलं की आपल्या बऱ्याच सदस्यांनी औरंगजेबावर चर्चा केली. काय दिवस आले आहेत, या वरिष्ठ सभागृहात औरंगजेबावर लोक चर्चा करत आहेत. आणि मला वाटतं की, याला जबाबदार आपले गृह मंत्रालय आहे.

**● तर हा देश एक राहणार नाही, राऊतांचा इशारा**

देशाच्या गृह 'मंत्रालयाने जर वेळीच अशा ज्या शक्ती आहेत, ज्या वारंवार औरंगजेबाचे नाव घेऊन देशात अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न करतात. त्यात काही लोक असे आहेत, जे महाराष्ट्रात मंत्री आहे. जे केंद्रात उच्चपदी आहेत. त्यांना जर आपण रोखलं नाही, तर हा देश एक राहणार नाही. देशात एकता आणि अखंडता ठेवण्याचे काम गृह मंत्रालयाचे आहे, असा इशारा राऊतांनी दिला.

मी बघतोय काही दिवसांपासून या राज्याला पोलिसी राज्य करून टाकलं आहे. त्यांचं काम काय आहे, तर विरोधकांना कम कुवत करणे. राजकीय पक्ष फोडणे, हे गृह मंत्रालयाचे काम आहे. प्रत्येक ठिकाणी. आमदार, खासदारांना खरेदी करण्यासाठी पोलिसांची मदत देणे. हे होत असेल, तर गृह मंत्रालयाचे जे मूळ काम आहे कायदा आणि सुव्यव्यस्ता राखण्याचे, असा टोलाही राऊतांनी शाह यांच्या मंत्रालयाला लगावला.

**● आता महाराष्ट्रही पेटवला आहे - संजय राऊत**

कालपर्यंत मणिपूर जळत होता. पण, आता महाराष्ट्रही पेटवला आहे. 'नई लाशे बिछाने के लिए, आपने गड़े मुर्दे उखाड़े' ते पण औरंगजेबाच्या नावाने. तीनशे वर्षात नागपूरमध्ये कधी दंगल झाली नाही. नागपूरचा इतिहास आहे. नागपूरसारख्या शहरात दंगल होते आणि तेही मुख्यमंत्र्यांच्या शहरात, अशी टीका राऊतांनी केली.

मला हे सांगायचं आहे की, जर तुम्हाला ▶▶ उर्वरित पान २ वर

# नुकसान भरपाई दिली नाही तर दंगेखोरांची प्रॉपर्टी विकणार; देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

नागपूरमध्ये सोमवारी मोठा हिंसाचार झाला, जमावाने आक्रमक होत दगडफेक केली, तोडफोड केली, पेट्रोल बॉम्बही फ ेकले. यात कोट्यवधींचे नुकसान झाले. या हिसांचारानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज पहिल्यांदाच नागपूरमध्ये आले, वरिष्ठ पोलीस आयुक्तांशी बैठक घेत त्यांनी सर्व आढावा घेतला. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधाताना त्यांनी प्रतिक्रिया दिली. दंगा करणाऱ्या प्रत्येकावर कारवाई होणार. कारवाई होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला. या हिंसाचारात ज्यांचं



नुकसान झालं त्यांना ३ ते ४ दिवसांत नुकसान भरपाई दिली जाईल. आत्ता जे काही नुकसान झालेलं आहे ते सगळं मुकसान दंगेखोरांकडून वसूल करण्यात येईल, दंगेखोरांनी ते पैसे भरले नाहीत तर त्यांची प्रॉपर्टी विकली जाईल असा थेट इशारा देत फडणवीसांनी आक्रमक भूमिका घेतली.

**● काय म्हणाले मुख्यमंत्री ?**

नागपूरमध्ये जी घटना झाली, त्याचा संपूर्ण आढावा नागपूरचे पोलीस आयुक्त, एसपी आणि वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत मी घेतला. एकूण घटनाक्रम आणि त्यानंतर केलेली कारवाई या सगळ्यासंदर्भातील हा आढावा होता.. मुळातच काही गोष्टी मी सभागृहात स्पष्ट केल्या होत्या. औरंगजेबाची कबर सकाळी

# वाल्मीक कराडपासून दादासाहेब खिंडकरच्या जिविताला धोका, पत्नीचे अधीक्षकांना पत्र!

**बीड । प्रतिनिधी**

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्म ीक कराडसह इतर आरोपींपासून आपले पती दादासाहेब खिंडकर यांच्या जिवीताला धोका असल्याची भिती अश्विनी खिंडकर यांनी व्यक्त केली आहे.

याबाबत त्यांनी कारागृह अधीक्षकांना निवेदन देऊन सुरक्षेसाठी गार्ड देण्याची मागणीही केली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सुत्रधार वाल्मीक कराड , सुदर्शन घुले,



जयराम चाटे, सुधीर सांगळे आदी आरोपी जिल्हा कारागृहात आहेत. तर, ओंकार सातपुते मारहाण प्रकरणाचा व्हिडीओ समोर आल्याने दादासाहेब खिंडकरसह इतर आरोपींवर पिंपळनेर पोलिस ठाण्यात कट रचून अपहरण व जिवे मारण्याच्या प्रयत्नाच्या कलम ाखाली गुन्हा नोंद झाला.

त्याची १० दिवसांची पोलिस कोठडी संपल्याने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावल्याने त्याचीही जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली. दादासाहेब खिंडकर हा संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांचा साडू आहे. देशमुख खुन प्रकरणातील प्रत्येक आंदोलन व इतर प्रक्रियांमध्ये खिंडकर देशमुख यांच्यासोबत असे.

दरम्यान, आता वाल्मीक व खिंडकर एकाच कारागृहात असल्याने खिंडकरच्या जिवीताला ▶▶ उर्वरित पान २ वर

# मनोज जरांगेंची नवी रणनीती, गावा-गावात हक्काचा माणूस उभा करणार, काय आहे प्लॅनिंग?

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी नव्याने रणनीती आखली आहे. मराठा आरक्षणाच्या लढ्यासाठी मनोज जरांगे यांनी बैठक घेतली. आता राज्यभरात मराठा सेवक नेमले जाणार आहे.

राज्यभरात गावपातळीवर मराठा सेवक आता नियुक्त केले जाणार आहे. या सेवकांची यादी ६ जून रोजी जाहीर केली जाणार आहे. जालन्यातील अंतरवाली सराटीम ध्ये मनोज जरांगे यांनी घेतली मराठा सेवकांची बैठक घेतला. यावेळी मराठा आरक्षणाचा लढा आणखी तीव्र करण्यासाठी नव्याने रणनीती आखण्यात आली आहे. जरांगे यांनी आज मराठा सेवकांची पहिल्या टप्प्यातील बैठक घेतली. समाजच्या समस्या सोडवण्यासाठी गाव पातळीवर मराठा सेवकाची निवड करण्यात येणार आहे. राज्यभरातल्या सेवकांची निवड झाल्यानंतर याची ६ जूनला जरांगे घोषणा करणार आहेत. दरम्यान आरक्षणाच्या मुद्द्यावरून जरांगेंनी राज्य सरकारला इशारा दिलाय. मराठ्यांशी दगा फटका केला तर तुमच्या आनंदावर विर्जन टाकीन.



मराठ्यांच्या जीवावर सत्तेत आले आरक्षण देत नाहीत. लाडक्या बहिणींमुळं सत्ते आले आणि त्यांना हफ्ता देत नाही. मुंबईला जायच अचानक ठरवीनं त्या दिवशी राज्य लॉक होईल, असा इशारा जरांगे यांनी दिला आहे.

**● मराठा सेवक कशासाठी ?**

'मराठ्यांचा सगळ्यांनी वापर करून घेतला फक्त भांडणासाठी उपयोग करून घेतला. पुढच्या काळातही मराठ्यांचा दरारा कायम ठेवणार आहे. आमच्या गोष्टी गावातल्या गल्लीत जाणं गरजेचं आहे म्हणून ६ जूनच्या आत राज्यातल्या गावागावत मराठा सेवक देणार आहे. एक सेवा करणारी फळी देणार आहे. मराठा सेवक असा की तो कोणत्याही पक्षाचा किंवा संघटनेचा नसणार आहे. नियुक्ती कुणाची करणार नाही ▶▶ उर्वरित पान २ वर




# ड्रायव्हरला डुलकी लागली गाडी डिवायडरला धडकली
## २ ठार, ७ जण जखमी, मयतात ५ वर्षीय मुलीचा समावेश

**● गेवराईजवळ पहाटे अपघात, सिन्नर तालुक्यातील लोणारे कुटुंब चालले होते तुळजापूर दर्शनाला**

**बीड । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातल्या सिन्नर तालुक्यातील लोणारे कुटुंब तुळजापूरला दर्शनाला जात होते. पहाटे साडेतीन वाजण्याच्या दरम्यान चालकाला डुलकी लागल्याने मारोती इको डिव्हायडरवर धडकली. यामध्ये २ जण ठार तर ७ जण जखमी झाले. ही घटना गेवराई जवळील रांजणी फाट्याजवळ असलेल्या पेट्रोल पंपाजवळ घडली. जखमीवर बीडच्या



जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे. जखमीमध्ये ३ लहान मुलांचा समावेश आहे.

नाशिक जिल्ह्यात असलेल्या सिन्नर येथील लोणारे कुटुंब तुळजापूर येथे देवदर्शनाला जात होते. पहाटे साडेतीनच्या सुमारास चालकाला झोप लागल्याने गाडी थेट गेवराईजवळ असलेल्या रांजणी फाट्याजवळ असलेल्या डिवायडरला



धडकली. अपघातात श्रावणी योगेश लोणारे (४), शंभू योगेश लोणारे (१.५), समर्थ योगेश लोणारे (१०), पुजा रामेश्वर लोणारे (२८), ▶▶ उर्वरित पान २ वर

दैनिक मराठवाडा पत्र

वर्धापन दिन

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

**चतुर्थ वर्धापन दिन**

**सर्वांना नमस्कार, ! तुमच्या प्रतिक्रिया आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत.**

आपले दैनिक मराठवाडा पत्र येत्या ३० मार्च २०२५ ला चार वर्ष पूर्ण करत असून पाचव्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे . गेल्या चार वर्षांत आपण सर्वांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. दैनिक मराठवाडा पत्रच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक ३० मार्च २०२५ ला आम्ही विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेष अंकामध्ये तुमच्या प्रतिक्रिया आमच्या पुढील कार्यासाठी महत्त्वाच्या ठरतील.

आपणं आपल्या प्रतिक्रिया दिनांक २५ मार्च २०२५ पर्यंत खालील ई-मेल व मोबाईल नंबरवर पाठवाव्यात. दैनिकाबद्दल आपली प्रतिक्रिया व फोटो पाठवावा हि विनंती.

मो.क्र. ९८२२१५२९५५, Email-dailymarathwadapatra2021gmail.com
वरील नंबर व ई-मेलवर प्रतिक्रिया पाठवाव्यात.

# मेरा रंग दे बसंती चोला, माय रंग दे...

२३ मार्च हा दिवस भारताच्या इतिहासातील एका महत्त्वपूर्ण घटनेची आठवण करून देतो, जिथे भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांसारख्या थोर क्रांतिकारकांनी फाशीची शिक्षा स्वीकारून देशासाठी आपलं सर्वोच्च बलिदान दिलं. या दिवशी आपण त्यांच्या त्यागाला आदराने आणि कृतज्ञतेने स्मरण करतो. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांसारख्या क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा दिल्यानंतर, २३ मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून ओळखला जातो. या शहीद झालेल्या क्रांतिकारकांनी देशासाठी आपलं सर्वोच्च बलिदान दिलं, ज्यामुळे त्यांच्या देशभक्तीने आणि त्यागामुळे नवीन पिढीला प्रेरणा मिळते. २३ मार्चला शहीद दिन म्हणून साजरा करून, आपण या थोर क्रांतिकारकांना आदराने आणि कृतज्ञतेने स्मरण करतो. भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांसारख्या क्रांतिकारकांना अटक करण्यात आली आणि त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. २३ मार्च १९३१ रोजी या तिन्ही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा देण्यात आली, ज्यामुळे २३ मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून ओळखला जाऊ लागला. १९२८ मध्ये भारतांमधील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून 'सायमन कमिशन' नावाचं शिष्टमंडळ आले होतं. भारतात सर्वत्र या शिष्टमंडळाचा काळे झेंडे दाखवून निषेध करण्यात आला. त्यावेळी लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला होता. 'सायमन परत जा'च्या घोषणांनी सारा परिसर दुमदुमून गेला. जमाव पांगवण्यासाठी पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठी आक्रमणात लाला लजपतराय जखमी झाले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. देशभक्तीने भारावलेल्या क्रांतिकारकांना हे सहन झाले नाही. क्रांतिकारकांनी लालाजींच्या मृत्यूला कारणीभूत असणाऱ्या लाहोर पोलिस ठाण्यातील इंग्रज अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याचे ठरवले. त्याप्रमाणे लालाजींच्या पहिल्या मासिक श्राद्धाच्या दिवशी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष पालटून पोलिस अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाकडे गेले. सॅण्डर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिला. भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाच वेळी गोळ्या झाडून त्याचा बळी घेतला.



भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना इंग्रजांविरुद्ध बंड करुन ब्रिटीश पोलिस अधिकारी जॉन. पी. सॅण्डर्सची हत्या केल्याप्रकरणी २३ मार्च १९३१ रोजी लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आली होती. या तिन्ही तरुण देशभक्तांच्या फाशीनंतर तमाम भारतीयांचं रक्त आणखी पेटून उटलं त्यांच्या बलिदानानंतर स्वांतत्र्यांची चळवळ अधिक प्रखर झाली.

शहीद भगतसिंग, राजगरु आणि सुखदेव यांच्या स्मर्णार्थ प्रत्येकवर्षी २३ मार्च रोजी श्रद्धांजली वाहत हा दिवस शहीद दिवस म्हणून भारतीय साजरा करतात. शहीद भगतसिंग यांनी आपल्या छोट्याशा आयुष्यात वैचारिक क्रांतिची ज्योत पेटवली. भगतसिंग यांच्या विचारणांनी आजही तरुण प्रभावीत आहेत. भगतसिंगांची लढाई केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरतीच मर्यादित नव्हती तर ती सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठी होती. ब्रिटीशांच्या जोखडातून म ातृभूमीला मुक्त करण्याबरोबरच समाजवादी रचनेवर आधारित समाज निर्माण करण्याचे भगतसिंग यांचे स्वप्न होते. सर्व माणसांच्या काही अत्यावश्यक गरजा आहेत. सर्वांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या अत्यावश्यक गरजा भागविण्याची सोय होणे म्हणजे समाजवाद, अशी भगतसिंगांनी व्याख्या केली होती. त्यांनी म्हटले होते की, 'क्रांती म्हणजे सध्या अस्तित्वात असणारी साम्राज्यवादी, भांडवली समाजव्यवस्था संपूर्ण उलथवून टाकून तिच्या जागी समाजवादी व्यवस्था प्रस्थापित करणे.' स्वातंत्र्य सैनिक भगत सिंह, राजगुरू व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी या सर्वांना आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जिवाची बाजी लावणारे ब्रिटीश सरकारने फाशीची शिक्षा दिली होती. त्यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस 'शहीद दिवस' म्हणून साजरा केला जातो असतो.२३ मार्च १९३१ रोजी संध्याकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी तिघांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी तिघांनी 'मेरा रंग दे बसंती चोला, माय रंग दे; मेरा रंग दे बसंती चोला।' हे गाणे गायले होते.

–श्री .कदम चंद्रशेखर महादेव , सहशिक्षक
बाळनाथ विद्यालय चाकरवाडी ता .जि . बीड .

# शिवरायांच्या नावापुढे छत्रपती आणि नावानंतर महाराज लावले गेलेच पाहिजे !



कोल्हापूर येथील 'शिवाजी विद्यापीठ', चे 'छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ', असा नामविस्तार करण्यात यावा या मागणीसाठी हिंदु जनजागृती समिती आणि हिंदु राष्ट्र समन्वय समिती यांनी हल्लीच जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढल्याचे वृत्त वाचनात आले. या मोर्च्यामध्ये हजारो शिवप्रेमी नागरिकांनी सहभाग घेतला होता. मुळात अशा प्रकारच्या मागणीसाठी हिंदुत्ववादी संघटनांना मोर्चे काढावे लागतात हीच या महाराष्ट्राची शोकांतिका आहे. ज्या महाराजांनी त्यांच्या जाज्वल्य पराक्रमाने आणि बुद्धिचातुर्याने तत्कालीन पाच पातशाह्यांना धूळ चारली, रयतेला भयमुक्त केले, ज्यांनी महाराष्ट्र घडवला अशा छत्रपती शिवरायांचा केवळ 'शिवाजी' असा एकेरी उल्लेख असलेले विद्यापीठाचे नाव म्हणजे महाराजांचा अवमानच आहे. अत्यंत प्रतिकूल काळात हिंदवी स्वराज्य स्थापन करणारे आणि रयतेच्या कल्याणासाठी राज्याभिषेक करवून घेणारे छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेवाद्वितीय उदाहरण असून प्रत्येक वेळी महाराजांच्या नावापुढे छत्रपती आणि नावानंतर महाराज हे विशेषण लावणे हा त्यांचा यथोचित सन्मानच नव्हे तर आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. राज्यात प्रदीर्घ काळ सत्तेत असणाऱ्या तत्कालीन राज्यकर्त्यांनी महाराजांना योग्य तो सन्मान दिला नसला, तरी सध्या सत्तेवर असलेल्या त्रिपक्षीय सरकारमधील दोन प्रमुख पक्ष हे हिंदुत्ववादी विचारसरणीचे आहेत, त्यामुळे त्यांनी या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. केवळ विद्यापीठ नव्हे, तर आज राज्यात अनेक चौक, नगर, मार्ग, क्रीडांगण, बाग-बगीचे, तळी यांना 'शिवाजी' असे एकेरी नाव दिलेले जागोजागी निदर्शनास येते. हा महाराजांचा अवमानच आहे. मुंबईतील शिवप्रेमी जनतेने आंदोलने केल्यानंतर मुंबईतील प्रमुख रेल्वे स्थानकाचा आणि आंतरराष्ट्रीय विमानतळाचा नाम विस्तार अनुक्रमे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ असा करण्यात आला. छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात महाराजांच्या सन्मानासाठी आंदोलने करावी लागणे हे योग्य नसून राज्य सरकारने याबाबत स्वतःहून अध्यादेश काढून ज्या ज्या ठिकाणी 'शिवाजी' असा एकेरी उल्लेख असेल अशा ठिकाणची नावे बदलून छत्रपती शिवाजी महाराज असा नामविस्तार करावा.

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

पान १ वरून पुढे...

## औरंगजेबाची कबर...

औरंगजेबाची कबर तोडायची आहे, तर बिनधास्त तोडा. तुम्हाला कोणी रोखलंय? तुमचे सरकार आहे. केंद्रात आणि महाराष्ट्रात तुमचं सरकार आहे. गृह मंत्री तुमचे आहेत. महाराष्ट्रात मुख्यमंत्री तुमचे आहेत. फावडे घेऊन तिकडे जा आणि तोडा. पण, तुमच्या मुलांना पाठवा. आमच्या मुलांना पाठवू नका. तुमची मुले परदेशात शिक्षण घेत आहेत. परदेशात काम करताहेत. आणि गरीब मुलांना पाठवू नका, अशी घणाघाती टीका संजय राऊत यांनी केली.

## नुकसान भरपाई...

जाळण्यात आली. त्यानंतर काही लोकांनी तक्रार केली. पोलिसांनी तक्रार घेतली. मात्र, कबर जाळत असताना कुराणचे आयत लिहिलेली चादर जाळली असा भ्रम तयार करून काही लोकांनी सोशल मीडियातून अपप्रचार केला. त्यानंतर मोठ्या प्रमाणात संध्याकाळी जमाव आला, तोडफोड केली. जाळपोळ केली. लोकांवर हल्ला केला. पोलिसांनी चार पाच तासातच या संपूर्ण दंगलीला अटकाव केला. अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. या घटनेचे जेवढे सीसीटीव्ही फुटेज होते, खाजगी लोकांनी जे मोबाईलवर चित्रीकरण केलं ते असेल पोलिसांनी जे चित्रीकरण केलं, जे दंगेखोर दिसतात त्यांच्यावर अटकेची कारवाई केली, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

आरोपींमध्ये अल्पवयीन मुलांचा समावेश- नागपूर राड्याप्रकरणी आत्तापर्यंत १०४ आरोपींची ओळख पटली, त्यापैकी ९२ लोकांना अटक केली. आरोपींमध्ये काही अल्पवयीन आहे, १२ लोकं हे १८ वर्षांच्याखालचे आहेत. त्यांच्यावरही कायद्याने कारवाई केली. अजूनही आयडेंटिफिकेशन सुरू आहे. अजूनही लोक आहेत. त्यांनाही अटक करण्याचा पोलिसांचा मानस आहे. जो व्यक्ती दंगेखोरांना मदत करताना दिसतोय त्याच्यावर कारवाई करण्याची पोलिसांची मानसिकता आहे. पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. सोशल मीडियाचं ट्रॅकिंग करून ज्या लोकांनी ही घटना घडावी म्हणून पोस्ट केल्या त्यांना दंगेखोरांच्यासोबत सहआरोपी करणार आहे. त्यांनी दंगा भडकवला. ६८ पोस्ट आयडेंटिफाय होऊन डीलिट झाल्या आहेत. त्यांच्यावर कारवाई झाली आहे. अजून काही पोस्टची माहिती घेतली जात आहे. ज्यांनी भडकवणारं पॉडकास्ट केलं, ज्यांनी चुकीच्या पोस्ट टाकून अफवा पसरवली त्यांच्यावर कारवाई होईल.

३ ते ४ दिवसांत नुकसान भरपाई देणार- ज्यांचं नुकसान झालं, गाड्या फुटल्या, अर्धवट गाड्या फुटल्या त्या सर्वांना नुकसान भरपाई येत्या तीन ते चार दिवसात दिली जाईल. आता जो काही आपण निर्बंध घातले आहेत. त्यामुळे थोडं जनजीवनावर परिणाम झाला आहे. त्यात शिथिलता आणण्याचा प्रयत्न राहील. त्याचवेळी पोलीस सजग राहील. कुणी परत असा प्रयत्न केला तर कडक कारवाई केली जाणार आहे. जे नुकसान झालं ते दंगेखोरांकडून वसूल केलं जाईल. त्यांनी पैसे भरले नाही तर त्यांची प्रॉपर्टी विकली जाईल. या गोष्टी सहन केल्या जाणार नाही. नागपूरमध्ये ९२ नंतर असा मोठा प्रकार घडला नाही. आता दंगेखोरांना अटकाव केला नाही तर ते सुटतील. त्यामुळे पोलीस कोणताही टॉलरन्स सहन करणार नाही.

## वाल्मीक कराडपासून...

वाल्मीक कराडपासून धोका असल्याची भीती त्याच्या पत्नीला आहे. पतीच्या संरक्षणाची जबाबदारी घेऊन, कायमस्वरूपी पोलीस गार्डचे संरक्षण द्यावे, तसेच इतर बरॅकमध्ये त्याला हलवावे, व सिसीटीव्हीच्या निगराणीखाली ठेवावे, अशी मागणी अश्विनी खिंडकर यांनी कारागृह अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

बीड जिल्ह्यात धनंजय देशमुखांच्या साडूचा म्हणजेच दादासाहेब खिंडकर याचा एक जूना व्हिडिओ समाजमाध्यमावर प्रचंड व्हायरल झाला होता. यात खिंडकर एका व्यक्तीला बेदम मारहाण करताना दिसत आहे. हा व्हिडिओ जूना असून तो वाद कधीच मिटल्याचा दावा खिंडकर याने केला होता. मात्र दादासाहेब खिंडकर याच्यावर घरफोडी, पैसे उकळून फसवणूक प्रकरणात गंभीर गुन्हे नोंद आहेत. बीड तालुक्यातील बाभुळवाडी गावचा सरपंच असलेल्या दादासाहेब खिंडकर याच्या ताब्यात गेल्या दहा वर्षापासून ही ग्रामपंचायत असल्याचे बोलले जाते.

## मनोज जरांगेंची...

मराठ्यांचा सेवक म्हणून हक्काचा माणूस देणार आहे. समाजाच्या अडचणी समस्या सोडवण्यासाठी मराठा सेवक दिले आहे, असं जरांगेंनी स्पष्ट केलं.

कोरटकर सरकारचा सोयरा

त्याचबरोबर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त विधान करणाऱ्या प्रशांत कोरटकरच्या प्रश्नांवरून जरांगेंनी फडणवीसांवर टीका केली असून हे सगळे फडणवीसांचे सोयरे आहेत. कोरटकरची प्रॉपर्टी जप्त का करत नाहीत. यांना कोरटकर सापडणार पण नसून यांना कचका दाखवावा लागेल, असंही जरांगे यांनी म्हटलं आहे.

## ड्रायव्हरला डुलकी..

रामेश्वर पोपट लोणारे (३७), पुनम योगेश लोणारे (३७), ईश्वरी रामेश्वर लोणारे (५), दत्तात्रय सोमनाथ आडभाई (४५) हे आठ जण जखमी झाले. तर योगेश पोपट लोणारे (४०) हे ठार झाले आहेत.

जखमींना रूग्णालयात दाखल केल्यानंतर यातील ईश्वरी रामेश्वर

पान ४ वरून पुढे...

लोणारे या ५ वर्षीय मुलीची प्रकृती गंभीर होती. उपचारा दरम्यान आज दुपारी १२.०० च्या दरम्यान तिचा मृत्यू झाला. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यासाठी लोकसेवा मंडळाचे नारायण पवार सह आदींनी मदत केली. जखमीवर बीडच्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## गॅस एजन्सी...

रहिवासी असल्याने सर्वपरिचित होते.त्यांचा स्वभाव मनमिळाऊ असल्याने मित्रपरिवार व नातेवाईकात हळहळ व्यक्त होत आहे.आत्महत्येचे कारण मात्र समजू शकले नाही.

## JEE Mains, MHT CET, ....

एकनाथजी शिंदे साहेब व युवा खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, युवासेना कार्याध्यक्ष श्री पुर्वेश सरनाईक यांच्या माध्यमातुन मोफत असणार आहे आणी मोफत नोंदणीसाठी लिंक: ह्मींिि:// ेह्मींिीश्र.रीं/४श्रटर्ी वर जाऊन विद्यार्थ्यांने या ऑनलाईन मॉक टेस्ट मध्ये सहभागी व्हायचे आहे अशी माहिती युवा सेना कार्यकारिणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपूर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे व युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे, युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे

यांनी दिली असून, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी

यांनी या ऑनलाईन मॉक टेस्ट मध्ये सहभाग नोंदवावा व आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी एक पाऊल पुढे टाकावे असे आवाहन युवासेना कार्यकारिणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे व बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे,युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# "मुस्लीम बांधवांकडे डोळे वटारुन पाहाल तर...", अजित पवारांनी इफ्तार पार्टीत दिला स्पष्ट इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

काही दिवसांपासून मुघल शासक औरंगजेबाची कबर आणि नागपूर येथे उसळलेली दंगल यामुळे राज्यातील वातावरण तापलेले आहे. राज्यात दोन गटात तणावाची पार्श्वभूमी असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे इफ्तार पार्टीचे आयोजन करत मुस्लीम समुदायाशी संवाद साधला. मुस्लीम समुदायाला धमकविण्याचा किंवा जातीय तेढ करण्याचा प्रयत्न केला तर अशा लोकांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा अजित पवार यांनी यावेळी दिला.




मुंबईत आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीत मुस्लीम समुदायाला रमजानच्या शुभेच्छा देत असताना अजित पवार म्हणाले, भारत हा विविधतेत एकतेचे प्रतिक असलेला देश आहे. विभाजनवादी शक्तींच्या जाळ्यात कुणीही अडकू नये.मुस्लीम समुदायाला विश्वास देताना अजित पवार म्हणाले की, तुमचा बंधू म्हणून मी तुमच्या पाठिशी उभा आहे. जर कुणी मुस्लीम बांधव आणि भगिनींना त्रास देण्याचा किंवा त्यांच्याकडे डोळे वटारून पाहण्याचा प्रयत्न केला तर त्याला सोडले जाणार नाही.

आपण होळीचा सण एकत्र साजरा केला. आता गुढीपाडवा आणि ईदही एकत्र साजरा करू. हे सर्व सण आपल्याला एकत्र राहण्याचाच संदेश देतात. आपण सण एकत्र साजरे करतो कारण एकता ही आपली शक्ती आहे. मुस्लीम समुदायाच्या पाठिशी मी खंबीरपणे उभा आहे, असेही अजित पवार म्हणाले.

रमजान हा सण केवळ मुस्लीम समुदायापुरता मर्यादित नाही. रमजानने मानवतेचा संदेश दिला असून त्याग आणि स्वयंशिस्तीचे धडे यातून मिळतात. या पवित्र महिन्यात वंचितांचे दुःख काय आहेत, हे समजते. रमजानच्या महिन्यात शरीर आणि मनाचीही शुद्धता होते, असेही अजित पवार म्हणाले.

दरम्यान राज्यात गेल्या काही दिवसांपासून मुघल शासक औरंगजेबाची छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात असलेली कबर वादात आहे. हिंदू संघटनांकडून सदर कबर नष्ट करण्याची मागणी होत आहे. तर नागपूर येथे या विषयावरून दंगलही उसळली होती. या दंगलीत अनेक वाहने, घरांचे नुकसान झाले. तर पोलिसांसह काही नागरिक जखमी झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सदर परिसरात दोन दिवस कर्फ्यू लावण्यात आला होता. दंगली प्रकरणी पोलिसांनी शंभरहून अधिक लोकांना अटक केली आहे. सदर दंगलीचे पडसाद महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही उमटलेले आहेत. सत्ताधारी बाकांवरून औरंगजेबाची कबर उखडून टाकण्याची भाषा वापरली जात असताना महायुतीमधील घटक पक्ष असलेला राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष मात्र वेगळी भूमिका घेताना दिसत आहे. राज्यात धार्मिक तेढ पसरविणारे विधाने कोणत्याही नेत्याने करू नयते, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसने केले आहे.

# गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या दुरुस्तीसाठी आलेल्या निधीतून दर्जेदार काम होणार का?

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**



समग्र शिक्षा अभियान अतर्गत जिल्हाभरातील गटशिक्षणाधिकारी कार्यालयांना दुरुस्ती निधी प्राप्त झालेला आहे त्यातच धारूर गटशिक्षणाधिकारी कार्यालयात दहा लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमध्ये गुत्तेदार आणि अभियंता यांनी संगमत करत ओबडधोबड पद्धतीने रंगरंगोटी करून कार्यालयीन खोल्यांमध्ये काम करत असतानाही इस्टिमेट आणि प्रत्यक्ष कामाचा कुठेच ताळमेळ ठेवलेला नाही. सदरील काम घाई गडबडीत उरकून मार्च मध्येच काम पूर्ण होण्याआधीच बिले दाखल करण्याचा घाट असल्याची चर्चा सर्वत्र आहे. तरी कामाचा दर्जा ठरवूनच अभियंता इम्रान खान लोधी यांनी गुत्तेदाराला तंबी देऊन दर्जेदार काम करून घेण्याची मागणी होत आहे. जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी कार्यालयाला दुरुस्तीसाठी समग्र शिक्षा अभियान कडून भरघोस निधी प्राप्त झालेला आहे. धारूर गटशिक्षणाधिकारी कार्यालयासही तब्बल दहा लाख रुपयांचा निधी इथे मंजूर करण्यात आलेला आहे. विशेष म्हणजे हा निधी कुठल्याही टेंडरच्या माध्यमातून गुत्तेदाराला प्राप्त होणार नसून शिफारस पत्राद्वारे निधी उपलब्ध झालेला असल्याने येथे कोणत्याही प्रकारची टक्केवारी समोर येत नाही. तरीही इथल्या कार्यालयाची छोटी मोठी दुरुस्ती आणि रंगरंगोटीसाठी आलेल्या दहा लाख रुपये निधीचा इथे पूर्णतः गैरवापर सुरू आहे. इथल्या कामात प्रचंड मोठ्या प्रमाणावर अनियमिता ठेवत गुत्तेदाराने अभियंत्याशी संगणमत केल्यामुळे कामाबाबत प्रश्नचिन्ह उभा राहत आहे. कार्यालयास देण्यास सुरू असलेली रंगरंगोटी ही एक पावसाळाही टिकणार आहे का नाही असा प्रश्न पडत आहे. अशा निकृष्ट दर्जाचा रंग इथे वापरला जात आहे. तर कार्यालयातील उघडलेली फरशी दुरुस्त करत असताना चढ उतार न पाहता ओबडधोबड पद्धतीने इथलं काम उरकून घेण्याचे काम अभियंत्याची मर्जी राखून गुत्तेदार करत आहे. सदरील ठिकाणी दर्जेदार कामाची मागणी केल्यानंतर अभियंत्यकडून उत्तर देण्यास टाळाटाळ केली जात आहे. दहा लाख रुपयांचा निधी अक्षरशः ओबडधोबड पद्धतीने खर्च करून गुत्तेदार अभियंता संगनमताने पद्धतशीर दहा लाखाच्या निधीवर हात साफ करत आताचे चित्र समोर दिसत आहे तरी काम दर्जेदार करून पैशाचा योग्य वापर करून काम चांगल्या दर्जाचे करावे अशी मागणी नागरिक करत आहेत

# अनिलदादा जगताप फाउंडेशनकडून मंजेरी हवेली शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या वाटप!

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या समाज कार्याला प्रभावित होऊन बीडमधील असंख्य तरुणांनी एकत्रित येऊन समाजसेवेचे कार्य करण्यासाठी अनिलदादा जगताप फाउंडेशनची स्थापना केली. या फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात दिला जातो. याबरोबरच समाजपयोगी उपक्रम राबविले जातात. अनिलदादा जगताप फाउंडेशनचे सचिव आकाश भैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पाली सर्कलमधील जिल्हा परिषद शाळा (मंजेरी हवेली) येथील विद्यार्थ्यांना दि. २१ मार्च २०२५ रोजी अनिलदादा



जगताप फाउंडेशनच्या वतीने वह्या वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तथा पालकांच्या उपस्थितीमध्ये अनिलदादा जगताप फाउंडेशनचे कार्यवाहक प्रतिक कांबळे यांनी या वह्या वाटप केल्या. जिल्हा परिषद शाळा मंजेरी हवेलीचे मुख्याध्यापक सय्यद सर आणि उपस्थित पालकांनी यांनी अनिलदादा जगताप फाउंडेशनचे आभार व्यक्त करत फाउंडेशनच्या समाजसेवेच्या कार्याचे कौतुक केले आणि अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# भागवत धर्मराज करांडे याची अग्निवीर इंडियन नेव्ही मध्ये निवड



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील एनसीसी विभागाचा विद्यार्थी भागवत धर्मराज करांडे याची अग्निवीर इंडियन नेव्ही आयएनएस चिल्का ओडिसा राज्य येथे निवड झाल्यानिमित्त प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते शाल पुष्पहार देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यास एनसीसी माध्यमातून उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील एनसीसी विभागातील अनेक विद्यार्थी भारतीय सैन्य दलामध्ये भरती होत आहे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब असल्याचे प्राचार्यांनी सांगितले.

# अंत्यविधीसाठी पैसे नसलेल्या त्या सात वर्षीय चीमुकलीवर बीडच्या अमरधाम समशान भूमी मध्ये नातेवाईकांच्या उपस्थितीत समाजसेवकांकडून दफनविधी



**बीड । प्रतिनिधी**

शुक्रवार दिनांक २१ रोजी सकाळी ९ च्या सुमारास एक महिला आपल्या सात वर्षीय चिमुकलीला घेऊन बीड जिल्हा रुग्णालयात दाखल झाली होती.

यावेळी तिने माझी मुलगी रात्री झोपल्यानंतर आज सकाळी झोपेतून उठत नसल्याचे सांगितल्याने डॉक्टरांनी त्या सात वर्षीय चिमकलीला तपासून ती येण्यापूर्वीच मरण पावल्याचे सांगून पुढील कारवाईसाठी सरकारी दवाखाना पोलीस चौकी अंमलदार पोहे का सौदागर यांना एम एल सी पाठवून दिली होती . परंतु सदरील महिला आर्थिक दृष्ट्या दुर्बल असल्याने तिने माझ्याकडे अंत्यविधीसाठी पैसे नसल्याचे कारण पुढे करून ती महिला निघून गेली होती . दरम्यान त्या सात वर्षीय चिमकलीचा मृतदेह शवविच्छेदन ग्रहामध्ये ठेवण्यात आला दरम्यान या अंगाला शहारे फोडणाऱ्या घटनेची माहिती रुग्णसेवक तथा पत्रकार अमजद खान यांना देण्यात आली पोलिसांची मदत घेऊन अंत्यविधीसाठी पैसे नसल्याचे सांगून निघून गेलेल्या आईचा व नातेवाईकाचा शोध घेऊन त्यांना आज दिनांक २२ रोजी बीड येथील अमरधाम शमशानभूमी येथे अंत्यविधीसाठी बोलावून घेत द्वारकाधीश मित्र मंडळ च्या मदतीने त्या मयत मुलीच्या नातेवाईकांसह परशुराम गुरखुदे रुग्णसेवक पत्रकार अमजद खान पत्रकार अक्षय रेडे वाहन चालक शेख शाहेद यांनी आज दुपारी दफन विधी केला असून त्यांच्या या कार्यामुळे बीड जिल्ह्यात माणुसकी जिवंत असल्याचे उदाहरण समोर आले आहेत.

# कोमलवाडी येथे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई



- पुढाऱ्यांनो, राजकारण बाजूला ठेवून नागरिकांच्या समस्या सोडविणे अपेक्षित!
- पाणीटंचाईवर गाव पुढारी बोलणार का? याकडे लागले लक्ष!

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तालुक्यातील कोमलवाडी येथे उन्हाळ्याची चाहूल लागताच पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. गावातील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकायची वेळ येते की काय? शिवाय वेळप्रसंगी पाणी विकत घ्यावे लागणार की काय? अशी चिंता नागरिकांमध्ये निर्माण होताना दिसत आहे. परिससरातील विहिरी, तलाव कोरडे पडले आहेत. गावाला पाणी पुरवठा करणार्या शासकीय विहिरीचे पाणी तळाला जाऊन ठेपले आहे. त्यामुळे तेथील ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत आठवड्यातून एकदा पाणी येत आहे. आतापासूनच जर आठवड्यातून एकदा पाणी मिळत असेल तर, आगामी काळात हे चित्र अधिक भीषण होण्याची शक्यता आहे. परंतु यावर एकही गाव पुढारी बोलायला तयार नाही किंवा आवाज उठवायला तयार नाहीत. गाव पुढाऱ्यांना फक्त मतदानच्या वेळीच गावातील नागरिक किंवा गाव आठवतं का? असा प्रश्न यानिमित्त उपस्थित केला जात आहे. दरम्यानच्या, काळात कोमलवाडी गावाला पाणी पुरवठा करणार्या कोमलवाडी परिसरातील तलावाच्या पायथ्याशी असलेल्या शासकीय विहिरीचे पाणी एकदमच कमी झाले. त्यामुळे कोमलवाडी गावाला आठवड्यातून एक वेळेस पिण्याच्या पाण्यासाठी पुरवठा केला जात आहे. यंदाचा उन्हाळा अधिक कडक असणार असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. सरासरी तापमानात सार्वधिक अंशाने वाढ होण्याची शक्यता वर्तविली आहे. साहजिकच पाण्याची भीषण टंचाई निर्माण होण्याचे संकेत असताना गाव पुढारी मात्र सुस्त असल्याचे दिसून येत आहे. दरवर्षी ग्राम पंचायतीच्या माध्यमातून पाणी टंचाईसाठी बैठकीचे नियोजन केले जाते. मात्र, मार्च महिना अर्ध्यावर आला तरी अद्याप बैठक झालेली नाही.उन्हाच्या झळा वाढत चालल्या आहेत. कोमलवाडी गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. मात्र, ही बाब गाव पुढारी व प्रशासनाने अद्याप गांभिर्याने घेतली नसल्याचे दिसून येत आहे. पाणी टंचाईचे निवारणार्थ नियोजन करण्याची गरज असताना अद्याप एकही बैठक घेतलेली नाही. पाणी समस्या गंभीर बनल्यानंतरच गावच्या पुढाऱ्याला जाग येणार का, असा सवाल उपस्थित झाला आहे. कोमलवाडी गावचे सत्ताधारी पुढारी -विरोधीपक्ष पूर्णपणे अपयशी ठरल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळेच या गावांमध्ये पाण्याची टंचाई निमर्ण झाल्याचे चित्र दिसत आहे. मार्चपासूनच अनेक गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे. गावांसह शहरातील जनतेलाही नाथसागरचा आधार घ्यावा लागत आहे. एप्रिल आणि मे या कडक उन्हाच्या महिन्यांत परिस्थिती गंभीर होणार आहे. त्यामुळे, पाण्याची समस्या दूर करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. सध्या गेवराई तालुक्यातील अनेक गावांना पाणी समस्या आहे. काही ठिकाणी विहिरी आधारे पाणी समस्येवर मात करण्यात येत आहे. मात्र, या विहिरीत पाणी कमी झाल्यानंतर पुढे काय, अशी स्थिती आहे. अनेक गावातील कूपनलिका नादुरुस्त झाल्या आहेत. अनेक विहिरींचे पाणीही कमी झाले आहे. त्यामुळे, पाणी समस्या गंभीर बनण्याची चिन्हे आहेत.

## पाणीटंचाई गंभीर ; गाव पुढारी बधीर

**कोमलवाडीत आजही पाण्याचे दुर्भिक्ष्य कायम आहे. आजही पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने रहिवासी बेजार झाले आहेत ग्रामपंचायत व सत्ताधारी विरोधी पक्ष गावपुढारी यांच्या मार्फत मूलभूत सेवांच्या बाबतीत सुखाचे दिवस येतील, अशी आशा होती. मात्र एकही ठोस काम करण्यात गाव पुढाऱ्यांना म्हणावं तसं यश आलेले नाही. भीषण पाणीटंचाई आहे. यामुळे तेथील स्थानिक रहिवासी हवालदिल झाले आहेत. गाव पुढाऱ्यांना दिसतंय पण सुचंत नाहीं पाणीटंचाई गंभीर ; गाव पुढारी बधीर होऊन बसले की काय असा सवाल गावातील नागरिक करत आहेत.**

दैनिक ● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
रविवार, दि.२३ मार्च २०२५ 

## गॅस एजन्सी मध्येच मॅनेजरने घेतला गळफास; बीड शहरातील बार्शी नाका भागातील घटना



बीड । प्रतिनिधी

संतोष एकनाथ जाधव वय ४० वर्ष राहणार बार्शी नाका हा तरुण मागील काही वर्षापासून इंडियन गॅस एजन्सी मध्ये मागील २० वर्षापासून मॅनेजर म्हणून काम करत होता.आज सकाळी एजन्सी मधील एका केबिनमध्ये संतोष जाधव यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्याने पेठ बीड पोलीसांना याची माहिती दिली असता,तत्काळ पोलिसांनी घटना स्थळी येऊन पंचनामा केला व प्रेत शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले. संतोष जाधव हे अनेक वर्षापासून मॅनेजर व बार्शी नाका भागातील ▶▶ उर्वरित पान २ वर

# देवपिंपरी येथे जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम अतिशय निकृष्ट!

## संबंधित ठेकेदाराने मनमानी कारभार करत केले बोगस कामे?

### पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी?



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेची अनेक कामे सुरू आहेत. ही कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचा आरोप अनेक गावांमधील नागरिकांकडून होत आहे. तसेच जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामांत गैरव्यवहार झाला असल्याची खंत आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत आवाज उठवला आहे. आणि तसे तालुक्यातील देवपिंपरी ग्रामपंचायत अंतर्गत जलजीवन पाणीपुरवठा योजनेच्या कामे हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे सरपंच नंदा गवारे यांच्याकडून सांगण्यात येत आहे. याप्रकरणी त्यांनी पाणीपुरवठा अभियंता यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार देखील केली आहे. पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी अशी, मागणी होत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील देवपिंपरी ग्रामपंचायत अंतर्गत जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम केले आहे. ज्यामध्ये विहीर, पाइपलाइन, गावाअंतर्गत नळाद्वारे पाणीपुरवठा करणे, जुन्या विहिरीचे खोलीकरण करणे, नव्या विहिरीमध्ये व जुन्या विहिरीमध्ये आडवे बोर घेणे, तसेच नवीन विहिरीमध्ये मोटार पंप बसवणे असे इत्यादी कामे करणे आवश्यक होते. परंतु संबंधित ठेकेदाराने मनमानी कारभार करत हे सगळे कामे अतिशय निकृष्ट दर्जाचे केले आहे. शिवाय संबंधित ठेकेदाराने खोदलेल्या विहिरीला पाणी न लागल्याने गावात पाणीपुरवठा होत नाही. यामुळे गावकऱ्यांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. देवपिंपरी येथे पाणीटंचाई गंभीर असल्याने गावाला ट्रॅकरने पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. तसेच जलजीवन पाणीपुरवठा योजनेच्या अंतर्गत झालेल्या सर्वच कामाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई होणे गरजेचे आहे. यावेळी प्रत्यक्ष पाण्याची गरज आणि आवश्यक असणार्या बाबीकडे डोळे झाक करण्यात आली. प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर कोणालाही योजनेची माहिती न देता कामाचा सपाटा लावला. नागरिकांतून तक्रारी होऊ लागल्या. यामुळे बर्याच गावांत ठेकेदारावर कारवाई करावी या योजनेच्या निधीचे इस्टिमेट, प्रत्यक्ष झालेले काम आणि गुणवत्ता यांची तपासणी जिल्हा परिषद सिओ यांनी स्वतःच करायला हवी काही ठिकाणी निकृष्ट कामे झाल्याचे उघडकीस आले आहे. जलजीवनच्या कामावर प्रकाश टाकला. यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींना नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागले. त्यामुळे जागरूक झालेल्या नागरिकांनी व गावांतील लोक या कामावर सतत लक्ष ठेवून आहेत.अधिकार्यांचे व ठेकेदारांचे संगनमत उघड झाले असून, निधीचा गैरवापर होत असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव- संताप आहे. या योजनेचे काम अतिशय पारदर्शक व निर्दोष पद्धतीने व्हावे, यासाठी गाव पातळीवर नागरिकांसह गावचे लोकप्रतिनिधी सरपंच नंदा गवारे यांनी पुढाकार घेतला असून, या प्रकरणावर जिल्हा प्रशासनानेही तात्काळ लक्ष द्यावे, तातडीने कारवाई करावी अशी मागणी सरपंच व ग्राम सेवकांनी केली आहे अशी मागणी होत आहे.

# गेवराईच्या सिध्देश्वर मंदिरात शिवपुराण

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचा भाविकांनी लाभ घ्यावा!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील सावता नगर भागात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री. सिद्धेश्वराच्या कृपेने व गुरुवर्य परमपूज्य दिलीप बाबा उर्फ मसाननाथ महाराज घुगे श्री भगवान चिंतेश्वर मंदिर ,गेवराई यांच्या कृपा आशीर्वादाने श्री शिव महापुराण कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

येथील तरुण बांधवांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सिद्धेश्वर संस्थान सावता नगर गेवराई येथे सातत्याने धार्मिक अध्यात्मिक सांप्रदाय सेवेतून



वेगवेगळे उत्सव समितीच्या वतीने करण्यात येतात यात श्री .राम कथा ,भागवत कथा किर्तन महोत्सव अखंड हरिनाम सप्ताह गेल्या बारा वर्षापासून अखंडितपणे आहे यावर्षी श्री. शिवमहापुराण कथा प्रवक्ते श्री . श्री ह. भ. प. श्रीहरी महाराज रसाळ, व व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व सत्यनारायण महाराज लगड यांच्या संकल्पनेतून संपन्न होणार आहे.

तसेच दैनंदिन कार्यक्रम पारायणाची वेळ सकाळी साडेसात व शिवपुराण कथेची वेळ संध्याकाळी सात असुन२४ मार्च सोमवार रोजी आरंभ होणार असून ३१ मार्च रोजी यांच्या ह.भ.प.श्रीहरी महाराज रसाळ यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होईल. नंतर महाप्रसाद वाटप होईल. परिसरातील भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले.

### JEE Mains, MHT CET, आणि NEET या महत्वाच्या परीक्षा साठी युवासेना व वाकणकर सिनर्जी अकॅडमी तर्फे

## ऑनलाईन मॉक टेस्ट चे आयोजन विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा : युवासेना

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील युवकांच्या आणी युवतीच्या स्वप्नानां बळ देण्यासाठी युवासेना आणि वाकणकर सिनर्जी अक्ॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसेना मुख्यनेते श्री एकनाथजी शिंदे साहेब व युवा खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, युवासेना कार्याध्यक्ष श्री पुर्वेश सरनाईक यांच्या माध्यमातुन विदयार्थ्यांसाठी ऑनलाईन मॉक टेस्ट २०२५ चे राज्यभरात आयोजन करण्यात आले आहे. या ऑनलाईन मॉक टेस्ट मध्ये बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा आणी गएए चरळपी, चक्क्ष उएढ आणि छएएढ या महत्वाच्या परीक्षांची तयारी आणखी मजबूत करून आपली स्वप्ने साकार करावीत असे आवाहन युवा सेना कार्यकारिणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपूर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे व युवासेना बीड लोकसभा सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे ,युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजीत शिंदे यांनी आवाहन केले आहे. गशश ारळपी, चक्क्ष उएढ आणी छएएढ चे विद्यार्थी तरुण तरुणी ही मॉक टेस्ट घरबसल्या किंवा कुठल्याही ठिकाणावरून ही टेस्ट देऊ शकतात, तसेच कॉम्प्युटर, टॅब, अथवा मोबाईल याच्या माध्यमातून सुद्धा ही मॉक टेस्ट देऊ शकता ती सुद्धा अगदी मोफत, या परीक्षेचे वेळापत्रक : २६ मार्च, बुधवार - JEE MINS (Engineering) तसेच ६ एप्रिल, रविवार - MHT CET (Engineering/ Pharmacy), तथा २० एप्रिल, रविवार रोजी - NEET (Medical) असे वेळापत्रक असणार असून ही ऑनलाईन मॉक टेस्ट संपूर्णपणे युवा सेना आणी सिनर्जी अक्ॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसेना मुख्यनेते श्री ▶▶ उर्वरित पान २ वर

### माजलगाव तालुक्यात पीएम घरकुलाच्या नावाखाली ग्रामसेवक सह सरपंच करु लागले जनतेची लूट बी डी ओ त्यांना देऊ लागले सूट

## जीवने साहेब गोरगरिबांच्या ही आर्थिक लुट थांबवा आम्ही गाऱ्हाणं मांडायचं कोणाकडे?

माजलगाव । प्रतिनिधी

गोरगरीब जनतेला निवारा मीळावा कोणीही बेघर राहू नये म्हणून केंद्राच्या पंतप्रधान कार्यालयाकडून पीएम आवास योजना राबवण्यात आली खेड्यापाड्यातील गोरगरीब जनतेने आपल्याला घर मिळावा म्हणून सरपंच ग्रामसेवक यांच्याकडे याचना केली मात्र याचा गैरफायदा घेत माजलगाव तालुक्यातील सरपंच साहेब ग्रामसेवक घरकुल पाहिजे असेल तर पाच किंवा दहा हजार रुपयांचे मागणी करत आहेत मोल मजुरी करणारे लोक यांच्याकडे एवढे पैसे असते तर तुमचे घरकुल मागायला तरी आले असते का?

जीवणे साहेब तुम्ही प्रत्येक गोष्टीचा पुरावा मागता किंवा जीमेदारी झटकून मोकळे हतात मात्र कोट्यावधी रुपये खर्चून निर्माण केलेलं जिल्हा परिषद प्रशासन काय कामाचं? ही फक्त आम्ही माजलगाव तालुक्याची व्यथा मांडत आहोत जिल्हाभरात हीच परिस्थिती चालू आहे याबाबत कोणीही आवाज उठवत नाही जिल्हाभरातील सरपंच आणि ग्रामसेवक तुम्हाला घरकुल पाहिजे असेल तर आम्ही मागतो ती रक्कम तुम्हाला द्यावीच लागेल असे सांगतात आणि मंजूर घरकुलचे हफ्ते मिळविण्या साठी तुमचे इंजिनियर प्रत्येक हप्ता २०००रु मागतात अशे ५०,०००हजाराच्या पुढे जातात आणि हे सर्व लोक म्हणतात हे पैसे आमच्या एकट्यासाठी नसतात तर वरपर्यंत आम्हाला पैसे द्यावे लागतात असे असे सांगतात हे किती खरं आणि किती खोटं हे सर्वसामान्य जनतेला माहीत नाही मात्र याबाबत जिल्हाभरात प्रत्येक पंचायत समितीला जीवणे साहेबांनी जर कडक सूचना दिल्या बीडिओ यांचे कान पिळले तर जनतेची होणारी लूट निश्चितच थांबेल आणि हे झाले नाही तर भ्रष्ट प्रशासनाची इथून तिथून साखळी असते हा संदेश जनतेत जाईल आणि याचे अत्यंत वाईट परिणाम जिल्हा परिषद प्रशासनाला भोगावे लागतील हे मात्र निश्चित त्यामुळे जीवने साहेब जातीने लक्ष घाला आम्ही तुम्हाला तरुण तडफदार आणि इमानदार अधिकारी समजत आहोत आमचा हा गैरसमज ठरू नये एवढीच अपेक्षा.

### बीड शहरातील गयानगर परिसरात शिवमहापुराण कथेस प्रारंभ

बीड । प्रतिनिधी

शहरातील गयानगर परिसरातील जैन मंदिराच्या मागील कॉलनीमध्ये शुक्रवार (दि. २१) पासून सात दिवस शिवमहापुराण कथेस प्रारंभ झाला आहे. ही कथा सात दिवस चालणार असून २७ मार्च रोजी कथेची सांगता ग्रंथ मिरवणुक आणि महाप्रसादाने होणार आहे.शहरातील गयानगर परिसरातील जैन मंदिराच्या मागील कॉलनीमधील शोभा हनुमंतराव पिंपळे आणि छाया पांडुरंग वैद्य यांनी या शिवमहापुराण कथेचे आयोजन केले आहे. शुक्रवारी (दि. २१) रोजी कथा कार्यक्रम स्थळी नऊग्रह स्थापना, कलश स्थपना पुजा रवी सुरेश उबाळे आणि प्रतिभा रवी उबाळे यांच्या हस्ते आरती करुन शिवाजी माराज पवार-मांजरसुंबा यांनी शिवमहापुराण कथेस प्रारंभ केला.

# चिंच झोडपणी हंगाम सुरु; चिंच फोडुन बेरोजगारीवर मात; दुष्काळी परिस्थिती महिलांना रोजगार







लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरात चिंच झोडणीचे काम जोरदार सुरू असुन चिंच फोडणीच्या कामामुळे ग्रामीण भागातील महिला मजुरांच्या हाताला काम मिळत आहे.चिंच फोडणीसाठी १२ रूपये किलो दर मिळत असुन एक महिला दिवसातुन २५ ते ३० किलो चिंच फोडणी करत असल्याने ३५० रुपयांपर्यंत रोजंदारी पडत असल्याचे वाघमारे यांनी सांगितले. शेतमजुर, महिला वर्ग आर्थिक संकटात असताना अशावेळी चिंच फोडणी कामाने महिलांच्या हाताला काम मिळाल्याने बेरोजगारीचा प्रश्न काही प्रमाणात मिटला आहे.

चिंचा झोडण्याचे काम जिकिरीचे ; पुर्ण कुटुंबिला रोजगार : अजय थोरात

चिंचा झोडण्याचे काम फेब्रुवारी मध्ये सुरू होऊन मे महिन्यांपर्यंत संपते. या ४ महिन्यात ग्रामीण भागात यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते. झाडावर चढुन बांबुने झोडपुन चिंचा खाली पाडणे, पडलेल्या चिंचा वेचणे, त्यांच्यावरील टरफल बाजुला करणे,चिंचा फोडुन गर व चिंचोके वेगळे करणे आदी कामे कुटुंबातील महिला व मुले करतात. झाडांच्या फांदीवरून धोकादायक पद्धतीने झोडपणी करावी लागते.गेल्या १५ वर्षांपासून आम्ही भावंडे चिंचा झोडण्याचा व्यवसाय करत असल्याचे लिंबागणेश येथील अजय परमेश्वर थोरात यांनी सांगितले.

यावर्षी बाजारभाव चांगले; परंतु आवक कमी :चंद्रकांत आवसरे

गेल्या वर्षीच्या मानाने यावर्षी चिंचाला बाजारभाव चांगला मिळत असुन नगर येथील व्यापारी जागेवर येऊन माल घेऊन जातात.फोडलेल्या चिंचेला प्रतिकिलो ११ रूपये बाजारभाव मिळतोय. यावर्षी चिंचेच्या झाडांना चिंचेचे प्रमाण कमी असल्याने यावर्षी आवक कमी प्रमाणात असल्याचे लिंबागणेश येथील चिंचेचे व्यापारी चंद्रकांत आवसरे यांनी सांगितले.

